**फिरूनी नवी जन्मेन मी......**
**लेखिका- सौ. अर्चना दिनकर फडके**

घराचं कुलुप उघडून अनुप्रीता आत शिरली. चप्पल पर्स भिरकावून धप्पकन सोफ्यात विसावली. आज कशातच लक्ष नव्हतं तिचं, ऑफिस मधे पण सगळ्यांना जाणवलं पण कुणी काही बोललं नाही. ऊठून पटकन चहा करुन घेतला आणि तिच्या छोट्याशा गॅलरीत आली, सायलीच्या फुलांचा सुगंध दरवळत होता तरीही तिची कळी खुलली नाही. नेहमी प्रमाणे आवडतं  गाणं लावलं 'एकाच या जन्मी...'
पण छे!! ते ही बंद केलं.
आज सकाळपासूनच बेचैन होती ती.

उठल्यावर रोज सकाळी चालण्याचा शिरस्ता, तशी ती आजही नेहमीच्या ठीकाणी गेली होती , अचानक एका घोळक्यात तिला एक ओळखीचा चेहरा दिसला. आण्णा?? इकडे?? ती चक्कर मारुन त्या घोळक्या पर्यंत पोचली पण आण्णा कुठेच दिसले नाहित .
बघितलं का त्यांनी तिला ?
नसेल कदचित , नाहीतर नक्की थांबले असते.
ती घरी आली आणि आवरून ऑफिस ला गेली, पण मनातून काही जाईना, दिवस कसातरी ढकलला.
आता घरी आली तरी विचारचक्र चालूच.

आण्णा ! तिचे सासरे !  देवमाणुस! कदचित तिच्या वडीलांनी पण एवढी माया तिच्यावर केली नसावी जितकी तिला आण्णांकडून मिळाली. तिला आठवलं कॉलेज मधे तिची सुदिप शी ओळख झाली, मग मैत्री आणि प्रेम तेव्हां सुदिप ने तिला सांगितलं होतं ," अनु तुला माझ्या आण्णांसकट माझा स्वीकार करायचा आहे,मी त्यांना कधीही अंतर देणार नाही. मी खूप लहान असताना माझी आई गेली, तेव्हां पासून आण्णा आणि मी एवढंच आमचं जग आहे." केवढा अभिमान वाट्ला होता तिला सुदीपचा. आणि आण्णांनी तर तिला पहिल्या

दिवसापासुन आपलं मानलं होतं. इतकं सज्जन कुटुंब असल्यावर तिच्या घरच्यांच्या विरोध असण्याचा संभवच नव्हता आणि एका शुभमुहुर्तावर तिचं आणि सुदीपचं लग्न झालं.

लग्नानंतर त्या तिघांच जग झालं, तिला रूळायला अजिबात वेळ लागला नाही. आण्णा निवृत्त व्हायला दोन वर्ष होती त्यामुळे दिवसभर सगळेच ऑफिस ला जायचे पण रात्री जेवण एकत्र असायचं. दीप तर खुपच हौशी होता त्यामुळे दर Weekend ला बाहेरचा plan. कधी आण्णा असत कधी मुद्दाम काही कारण सांगून येणं टाळत. कधी ते स्वतःच या दोघांचं कुठे resort book करायचे, त्यांना एकांत मिळावा म्हणून. अनु आणि दीप पण त्यांची खूप काळजी घ्यायचे, एकटेपणा जाणवू द्यायचे नाहित.

आण्णा retire झाले आणि त्यांनी बरीचशी बाहेरची कामं स्वतः वर घेतली, अनुला त्यामुळे वेळ मिळू लागला. कधी तरी तर संध्याकाळी छानसं खायला करायचे, त्यांना सवय होती आणि यायचं पण सगळं. अनुच्या लक्षात एक गोष्ट आली की retire झाल्या पासून आण्णा जरा अवघडल्या सारखे वागत होते.
Retirement syndrome. एक दिवस ती दीप ला म्हणाली " दीप आज माझी बाहेरची कामं आहेत , मी ऑफिस ला जात नाही, दुपारी आण्णांना लंच ला बाहेर घेऊन जाईन. "
" अगं मग मी पण थांबतो ना, सगळेच जाऊ "
" काय रे , बाप-लेकित तुझं काय काम?"
तसा ही तो नेहमीच म्हणत असे की त्यालाच सासरी आल्या सारखं वाटतं, की ती मुलगी आणि तो जावई आहे असं वाटतं !
दीप च्या लक्षात आलं " का गं काही विशेष"?
"तुला आल्यावर सांगते" त्याचा तिच्यावर पूर्ण विश्वास होता ,तिच्या गालावर टिचकि मारत निघून गेला. सगळं  आवरून ती बाहेर निघाली, जाताना तिने आण्णांना तयार राहिला सांगितलं, त्यांना विचित्र वाटलं पण ते काही बोलले नाहित. बाहेरुन आली तेच मुळी एक भलं

मोठं parcel घेऊन. आण्णा खोलीतून बाहेर येताच त्यांना parcel उघडायला लावलं. आत बाजाची पेटी बघून चकित झाले. " तुमचीच आहे आण्णा, मी नीट करुन आणली. दीप ने सांगितले होते की तुम्ही खूप छान पेटी वाजावता. तुमची इच्छा असेल तर माझ्या मैत्रिणीचे सासरे तुमचा परत सराव करुन घेतील. माझं बोलणं झालं आहे त्यांच्याशी. आणि हा फॉर्म आहे clubhouse चा मेंबरशीपचा. तुम्ही उत्तम टेबल टेनिस खेळायचात असं पण ऐकलं. तुम्ही फक्त सही करा, बाकी formalities पूर्ण झाल्या आहेत."
" अगं पोरी , हे काय आहे सगळं?"
" आण्णा, तुम्ही दिवसभर घरात एकटेच असता. इतकी वर्ष केलच की सगळं मग आता retire झालात तर अवघड ,अपराधी का वाट्तय? तुमच्या मनाला वाटेल आणि आवडेल तेच करा. मनमोकळं हसा आणि जगा.
पेटी वाजवा, clubhouse ला जा, फिरायला जा मजा करा. समजा सुदीपचं लग्न झालं नसतं तर असं अवघड वाटलं असतं का? मग आता मी घरात आहे म्हणून सगळं बदललं का?
"असं नाही गं बेटा "
" नाही ना? मग एवढा लेकीचा हट्ट पूर्वाच "
संध्याकाळी दीप आल्यावर आण्णांनी त्याला सांगितलं तेव्हां जाम खुश झाला,तिच्यावर कौतुकाचा आणि प्रेमाचा वर्षाव केला. अण्णांची मग नियमित दिनचर्या सुरु झाली. विस्कटू पहाणारी घडी परत बसली.

असं छान चालू असताना अचानक काहीतरी बिनस्त, आपलीच दृष्ट लागते तसं झालं.
एक दिवस सुदीप ची स्वारी खूप आनंदात घरी आली. काय काय घेऊन आला होता तिच्या आवडीचं. नूर काय वेगळाच होता स्वारिचा. डोळे बोलत होते, ती मोहरली लाजली. आणि अलगद त्याने बाळाचा विषय काढला.
" सुदीप , हे काय नविनच? आपलं ठरलं होतं ना इतक्यात बाळाचा विचार करायचा नाही म्हणून?"

" अगं हो, पण आता काय हरकत आहे? Financial security आली आपल्याला, आणखी दोन वर्षात माझं परत promotion due आहे, मग कशासाठी थांबायचंय?"
वाद नको म्हणून तिने झोप येण्याचा बहाणा केला.
पण विषय तिथेच संपला नाही, उलट विषयाला तोंड फुटलं. रोज दीप तिला समजावी आणि ती नकार देई. हळू हळू दोघां मधे कुर्बुरी वाढल्या, बेडरूम ची भांडणं  घरात ऐकू येऊ लागली. आण्णा सूज्ञ होते त्यामुळे मधे पडले नाहित. पण एक दिवस दीप आण्णां समोर बोलला. त्यांनी तिची बाजू सावरली," अरे वेळ दे तिला थोडा विचार करायला."

पुढचे काही दिवस शांतपणे गेले, पण त्यात पूर्वीची मजा नव्हती, वर वर सगळं ठिक होतं पण दोघात एक विचित्र शांतता होती. पण काहीच दिवस! दीप ची गाडी परत मूळ पदावर आली.
"मग काय विचार केलास अनु"
' अरे विचार काय करायचा? माझ्या मनाची तयारी नाही झाली अजून "
" असं नको करुस गं! तुला भिती वाटते का की मी तुला नोकरी सोडायला लावीन? आपण बाई ठेऊ , मी पण तुला सगळी मदत करेन,शिवाय आण्णा आहेतच, त्यांना पण किती आनंद होईल".
" उगाच त्यांच्या नावाने मला blackmail करु नकोस!"
" काहीतरी बोलू नकोस, blackmail काय?"
हे  असे वाद रोज होऊ लागले त्यांच्यात. चार भिंतीतले वाद तिच्या माहेर पर्यंत पोचले. तिच्या आईबाबांनी पण तिला खूप समजावलं, रागवले तिला. आईने तर तिला डॉक्टर कडे पण जबरदस्तीने नेले, सगळे reports नॉर्मल आल्यावर, तिला म्हणाली ," सुख बोचतय का गं तुला? इतकी चांगली माणसं आहेत, काय चुकलं गं त्यांचं? एक मुल होऊ दे मग हवं तर विचार कर"
पण ती हट्टाला पेटली, कुणाचं ऐकलं नाही.
Counselling सुचवून झालं, जबाबदारी नको असल्याचे आरोप झाले, फक्त career पाहिजे,सौंदर्य घालवायचं नाही म्हणून टीका पण झाली,  असा पण संशय घेतला की तिच्यात दोष आहे आणि ती लपवत

आहे,पण ती मात्र निर्णयावर ठाम राहिली.
परिणामी , दीप बाहेर बाहेर राहू लागला. रात्री उशिरा येणे, न जेवताच झोपणे वाढू लागले. तिने पण त्याला खूप समजावले पण आता तो पण इरेस पेटला होता. एकाच घरात दोघं अनोळखी माणसासारखे राहू लागले.
एक दिवस अण्णांनी दोघांना आपल्यासमोर बसवलं,"जे घडतं आहे ते चांगलं नाही. घरातले वाद चव्हाट्यावर यायला वेळ लागणार नाही . काय तो निर्णय सामंजस्याने घ्यायला हवा".
" तुम्ही सगळे हे का मान्य करत नाही, की हा माझा चॉईस आहे. माझं मूल मला पाहिजे तेव्हांच जन्माला येणार"
हे ऐकून मात्र सुदीप रागाने लालबुंद झाला आणि तिच्यावर हात उगारला, पण आण्णा मधे पडले , त्याला त्याच्या खोलीत जायला सांगितलं., आणि तिला म्हणाले, " हा तुझा अहंकार बोलतो आहे बेटा"
" हिच परिक्षा केलीत का माझी आण्णा" मग खरं कारण सांग, मला पटलं तर मी दीपुला समजावतो"
" काहीच कारण नाही, पण आत्ता नको"
हे ऐकल्यावर त्यांनी पण हात टेकले तिच्यापुढे.
" मग सध्या मला एकच पर्याय सूचतो आहे. थोडे दिवस लांब रहा एकमेकांपासून. कदाचित परत पुर्वी सारखी ओढ वाटेल परस्परांविशयी मग बघू पुढे काय करायचं ते"
" मला घर सोडायला सांगता आहात का आण्णा"
" आता कोण कुणाची परिक्षा करत आहे?"
"सॉरी आण्णा "
" अगं तुझ्या भल्यासाठी सांगतो आहे पोरी. खूप चिडलेला आहे तो ,काहीबाही बोलत राहिल, लांब गेलीस की गोष्टी निवळतील. आणि माफ कर पण त्याचा राग अनाठायी नाही, आज मला त्याचं बरोबर वाटतं आहे."

ती लगेच माहेरी गेली, दीप ने साधं बघितलं पण नाही तिच्याकडे , अडवणं तर दूरच राहिले.

माहेरी गेली तर आईबाबांनी निक्षून सांगितले," सासरी परत जाण्यासाठी आली असलीस **तर** आनंदाने रहा.
तुला सासुरवास असता, काही त्रास असता, जावंयात काही खोट असती तर आम्ही स्वतः तुला इकडे घेऊन आलो असतो पण तुझ्या चुकीच्या निर्णयाला आमचा पाठिंबा नाही."

माहेरी आल्यापासून ऑफिस ते घर एवढंच विश्व झालं.
ती दीपच्या फोन ची वाट बघत होती, आण्णांकडून कळायचं पण तो मात्र फोन सुद्धा करत नसे. दोघांच्या प्रेमाची जागा आता अहंकाराने घेतली. कुणी एक पाऊल पुढे यायला तयार नाही, कुणी माघार घ्यायला तयार नाही. कुणी मध्यस्थी करुन उपयोग नव्हता.
शेवटी तिनेच दीपला फोन केला," तू मला न्यायला पण येणार नाहीस का?"
" तुझा विचार बदलला असेल तर आत्ता लगेच येतो "
तिने फोन कट केला, त्याला उत्तर मिळालं. काही  दिवसात दीपने divorce papers पाठवले. ती कोलमडली . सगळ्यांनी तिलाच दोष दिला, पण हे होणारच होतं. तिने मागचा पुढचा विचार न करता सही करुन papers पाठवून दिले. एक हसतं-खेळतं घर दोघांच्या आडमुठेपणामुळे उध्वस्त झालं. कोर्टात रितसर घटस्फोट झाला.

तिच्या आईबाबांनी तिला सांगितलं," निर्णय घेतलाच आहेस तर आता पुढचा विचार कर. आज न उद्या एकटं रहावच लागेल, आम्ही आहोतच , चुकत असलीस तरी आईबाप म्हणून तुझ्या साठी जीव तूटतो. तुला लागेल ती मदत आम्ही करु पण आता स्वतंत्र रहा. इथे राहिलीस तर रोज तेच विषय आणि तेच वाद. नव्याने आयुष्य सुरु कर."

काही दिवसातच तिने भाड्याने घर घेतले, छोटेसे पण टुमदार. हळू हळू आयुष्य परत मार्गी लागत होतं, पण आठ्वणी पिच्छा सोडत नव्हत्या. रोज दीप ची आठवण तिला बेचैन करे. मनाची घालमेल कुणाला सांगता येत नव्हती. आता तर आण्णांनी पण तिला फोन

करणं सोडलं. दीप इकडचं सगळं आवरून बंगलोरला गेल्याचं कळलं, आण्णा अर्थात त्याच्या बरोबर गेले.
हळूहळू मित्रमैत्रिणी पण तिला दुरावले, तिने पण कुणाशी फारसा संबंध नाही ठेवला. माहेरी महीन्यातून एक चक्कर होई पण आता पूर्वी सारखं काहीच राहिलं नव्हतं. दीप तिच्या आयुष्यातून गेल्यावर सगळ्याच सुखांनी पाठ फिरवली. दीप होताच तसा म्हणा!

अशीच दोन वर्ष गेली. दरम्यान तिचं प्रमोशन झालं, आणि मुंबईत तिची बदली झाली. कंपनी ने छान फ्लॅट दिला अगदी मोक्याच्या ठिकाणी. तिची घडी परत बसली. घर आणि ऑफिस एवढंच जग सिमित होतं तिच्यासाठी, सगळ्यांशी जेवढ्यास तेवढं बोले त्यामुळे कुणी जीवाभावाचे भेटलेच नाही. कुणी सलगी करण्याचा प्रयत्न केला तर ती झटकून टाकत असे आणि तसंही दीपच्या जागी ती कुणाचाही विचार करुच शकत नव्हती. पण दीप मात्र आयुष्यात पुढे गेला होता, त्याने लग्न केलं होतं एवढंच तिला कळलं. ज्या कारणासाठी divorce झाला त्याच कारणासाठी लग्न केलं असेल असं तिने स्वतःला समजावलं. मुंबईत आता तिचा चांगलाच जम बसला, कामात स्वतः ला झोकून दिलं होतं, त्यामूळे career पण आकार घेऊ लागलं. दिनचर्या ठरलेली असल्यामूळे एक शिस्त आली.

विचार करता करता अंधार दाटला आणि अचानक तिची विचार शृंखला भंगली, बेल वाजल्याचा भास झाला. छे! ह्या वेळेस कोण येऊ शकतं तिच्याकडे? भासच असेल! एवढा वेळ विचार केल्यामुळे जीव शिणला आणि भुकेची पण जाणीव झाली तिला म्हणून उठली तर खरचं बेल वाजत होती.
तिने चटकन दार उघडलं, तर दारात साक्षात आण्णा उभे !!
कोण आनंदली ती !!
" आण्णा, या ना आत. म्हणजे तुम्ही पण पाहिलात मला"
त्यांनी घोटभर पाणी प्यायलं आणि म्हणाले," मग , म्हणून तर तुझा पत्ता शोधत आलो इथपर्यंत. सकाळीच तू walking track वरुन

निघालीस तेव्हां एक-दोघांना विचारलं आणि रोज येतेस म्हंटल्यावर पुढचं सगळं सोप्पं होतं."
" कसे आहात? खूप वर्षांनी भेटलो, तुम्ही मुंबईत कधी आलात? "
"  दीप ने जॉब बदलला, त्यामूळे तिकडचं windup करून सगळेच इकडे आलो"
" कसा आहे दीप?"
" ज्या वाटेने जायचं नाही त्याचा पत्ता विचारून काय करणार तू?"
"कारण वाट विसरता येत नाही म्हणुन"
" विसरली पाहिजे तुला , आता खूप उशीर झाला. मला समजलं की तू जास्त कुणाशी बोलत नाहीस , एकटीच असतेस. लग्न का नाही केलस? अजुनही करता येईल तुला! "
" नाही आण्णा, माझ्या आयुष्यात दीपची जागा कुणी घेऊ शकत नाही. मी केलं तरी त्या नात्याला न्याय नाही देऊ शकणार."
" आज मुद्दाम आलो आहे मी, खूप दिवस एक ओझं आहे मनावर. बोलू का मनातलं?"
"असं का म्हणता, बाप-लेकीच्या नात्यात परवानगी काय मागायची,असं तुम्हीच सांगायचात"
"मुल नको असल्याची कारणं तू सांगितलीस, पण मी तुला खूप चांगलं ओळखतो. तू अविचारी नाहीस मग असं काय होतं जे तू लपवत होतीस? सांग बेटा, या विचाराने माझं मन पोखरलं इतकी वर्ष . आता तरी सांग"
" नाही आण्णा काही वेगळे कारण नव्हते"
"माझ्यावर जर खरचं मुलीसारखी माया केली असलीस तर आज तू खरं सांगशील"
" कसं सांगू तुम्हांला? आठवतं का तुम्हांला आपण सगळे एकदा तुमच्या मित्राच्या farmhouse वर अलिबागला गेलो होतो. बरीच मंडळी होती, रात्री गाण्याचा कार्यक्रम होता"
" हो आठवलं, त्याचं काय?"
" गाणी सुरु असताना अचानक दीप आणि काही मित्र नाचायला लागले, मी हसून दीप कडे बघत होते, तेवढ्यात एक बाई माझ्याजवळ आली

आणि म्हणाली, "खूप प्रेम आहे ना तुझं त्याच्यावर? मी मगापासून पहाते आहे तुम्हां दोघांना. पण हा आनंद फक्त तिसरा तुमच्यात येई पर्यंतच टिकणार आहे". मला काही समजायच्या आत त्या निघून गेल्या. अंधारात चेहरा पण नीट नाही बघितला. मनातून तो विषय जाइनात, घरी आल्यावर अलिबागला फोन करुन विचारलं, तेव्हां त्यांची सून म्हणाली की शेजारच्या बंगल्यात कुणितरी अमेरिकेहून पाहुणी आली होती आणि ती ज्योतिष शास्त्राची अभ्यासक होती , ती दोन दिवसात परत पण गेली. मी काय झालं हे कुणाला सांगू शकत नव्हते. तुमचा दोघांचा तर अशा गोष्टींवर अजिबात विश्वास नाही, आणि तुम्हाला पटलं पण नसतं. काय करावं सुचत नव्हतं शेवटी वेळ आल्यावर बघू म्हणून मी सोडून दिलं पण अपेक्षेपेक्षा वेळ लवकर आली "

आण्णा सुन्न होऊन बसले. आणि एकदम चिडून ओरडले ," अशक्य, अतर्क्य वागलीस! तुझ्यासारखी शिकलेली मुलगी एवढ्याश्या बोलण्यावर आपला संसार मोडू शकते? बोलली असतीस आमच्याशी, काहीतरी अर्थ लावुन मोकळी झालीस? केवढा हा मूर्खपणा केलास? मला अजुनही तुझं हे कारण खरं वाटत नाही ".

" आणि त्या बाईचं म्हणणं खरं झालं असतं तर? काय केलं असतं आपण आण्णा?कसं सहन केलं असतं?"
" अगं वडे , तुझ्या लक्षात येतंय का की तुझ्या मूर्खपणा मुळे त्या बाईचं भाकित खरं ठरलं? केवढी मोठी चूक करून बसलीस पोरी!! अगं एकदा तरी बोलायचं, इतक्या वेळा तुला विचारलं आम्ही दोघांनी."
आण्णा हताश होऊन मटकन सोफ्यात बसले.

"मी विचार केला नाही असं वाटलं का आण्णा? खूप विचार केला, पण मी हा धोका कसा पत्करणार?
ते ही दीपच्या बाबतीत? आणि तुम्ही आण्णा? सहन करु शकला असता का दीपला काही झालं तर?"
" जे प्राक्तनात असतं ते अटळ असतं पोरी, उद्याचा विचार करुन आपला

आज खराब होतो, आणि तू नेमकं हेच केलस, त्यातून 'दोघात तिसरा
' ह्याचा वेगळा अर्थ पण होतो"
"होतो ना, पण त्या कुठल्याही अर्थाचा शेवट चांगला नव्हता "
" असो, जे झालं ते आता बदलू शकत नाही, तुझं कारण तुला पटलय
ना?  मी निघतो, सूनबाई जेवणासाठी वाट बघत असेल, पण जाण्या
आधी एक बाप म्हणून तुझाही आणि त्याचा ही, विनंती करतो
की शक्यतो दीप च्या नजरेस पडू नकोस. जमलच तर लांब जा.
ह्यातच तुम्हां दोघांचे हीत आहे.
गैरसमज करून घेऊ नकोस बेटा, पण मोठ्या मुश्कीलीने मी दीपुला
सावरलं आहे, आता त्याला हे सगळं कळलं तर परत मोडेल तो. आता
त्याच्यावर तीन जीव अवलंबून आहेत. हो ,जुळी मुलं आहेत त्याला.
आता कुठे तो हसू बोलू लागला आहे. मुलांमध्ये असला की मोकळा
होतो, आता त्याला सावरायला माझ्यात ताकद नाही बेटा"
"मी समजले आण्णा, पण मी तुम्हाला तरी फोन करु शकते ना?"
" नको, हा आपला पण शेवटचा निरोप समज. मायेचे पाश तोडायला
हवे , तुझी जागा इतर कुणाला देणं
आम्हांला पण जड जातं, म्हणुन तर हिला मी सुनबाईच म्हणतो. पोर
लाघवी आहे पण आता मायेचा मोह टाळतो. त्यांच्या पुढच्या सुखासाठी
आपण न भेटलेलं आणि न बोललेलं बरं. रडू नकोस पोरी. येतो मी.
एकटीने आयुष्य घालवणं सोप्पं नाही, मी सांगितलं त्याचा विचार कर."
तिने वाकुन नमस्कार केल्यावर त्यांनी मायेने हात ठेवला तिच्या
डोक्यावर आणि पटकन वळले. दोन पावलं पुढे गेले आणि थबकले.
तिला म्हणाले," तुला दिलासा मिळणार असेल तर एक सांगू? दीपची
बायको नेहा हिचा पण आधी विवाह झाला होता पण फक्त आठच महिने
संसार झाला होता. नुकतीच ती आई होणार असल्याची गोड बातमी
त्यांना समजली होती. पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. तिचा
नवरा अकस्मात अपघातात गेला. सासरच्यांनी माहेरी पाठवुन दिली.
आई-वडील हवालदील झाले. तिचे मेव्हणे दीपच्या ऑफिस मधे होते
आणि हळूहळू सगळं जूळून  आलं. तिची ताई आणि मेव्हणे खंबीरपणे
तिच्या पाठीशी उभे राहिले. लग्नं register झालं आणि त्यानंतर जुळ्या

मुलांचा जन्म झाला. मुद्दामच लग्न आधी केलं कारण मुलांच्या दृष्टीने तेच हिताचं होतं . मुलं दोन वर्षांची झाली आणि दीपने इकडे नविन नोकरी धरली , इथे कुणी ओळखत नाही म्हणजे सध्यातरी मुलांच्या कानावर काही येणार नाही. पुढे मोठी झाली की सांगता येईल. त्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने दीपचं नाव लावणंच योग्य आहे आणि सुनबाईला हे मान्य आहे.  ती मुलांसाठी सध्यातरी घरीच असते पुढे बघू !"

"  घाबरू नका आण्णा! मूलांना बघण्याचा कितीही मोह असला तरी मी परत कधीही दीपच्या आयुष्यात डोकावणार नाही. आज मला त्याचा खूप अभिमान वाटतो. तुम्ही जे सांगितलं ते ऐकून माझ्यात जगण्याचं बळ आलं आहे आता मी माझ्या आयुष्याचा नव्याने
विचार करेन. जाता जाता फक्त एकदाच सांगा आण्णा की
माझं चुकलं नाही म्हणून!"

".........येतो बेटा, काळजी घे आणि सुखात रहा"

आण्णा निघून गेले. तिचा प्रश्न अनुत्तरित ठेऊन.

खरचं चुकलं का तिचं ?

दूर कुठेतरी तिला स्वर ऐकू आले, "एकाच या जन्मी जणू ,फिरूनी नवी जन्मेन मी....."

खरंच येईल असा नवा जन्म घेता?  याच जन्मी ??

*********************************

Last modified: 00:24